लोकमत

# शिव-ज्ञानसागर, संशोधक माहिती प्रणालीचे आज उद्घाटन

## शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा वर्धापनदिन समारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या ५७ व्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या शिव-ज्ञानसागर : इन्स्टिट्यूशनल रिपॉझिटरी ऑफ शिवाजी युनिव्हर्सिटी आणि इंडियन रिसर्च इन्फर्मेशन नेटवर्क सिस्टीम (आय.आर.आय.एन.एस.) या दोन अत्यंत महत्त्वाच्या उपक्रमांचे उद्घाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. उद्धव भोसले यांच्या हस्ते करण्यात येणार आहे, अशी माहिती बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली.

प्रसिद्धिपत्रकात म्हटले आहे की, विद्यापीठाच्या सर्व अधिविभागांतील विषयतज्ज्ञ व संशोधक विद्यार्थी यांनी डिजिटल स्वरुपात निर्माण केलेल्या रिपॉझिटरीमध्ये विद्यापीठाच्या विविध कार्यक्रमांची छायाचित्रे, वार्षिक अहवाल, विद्यापीठाची अन्य प्रकाशने, दीक्षान्त संबोधने, अन्य विविध प्रमुख कार्यक्रमांतील भाषणे, विविध परीक्षांच्या प्रश्नपत्रिका, अधिविभागातील संशोधकांचे शोधनिबंध व प्रकाशने, इत्यादी सर्व नवी-जुनी माहिती साठवून ठेवता येईल आणि ती जगाच्या पाठीवरुन कोठूनही मिळविणे शक्य होईल. ही माहिती विद्यापीठाच्या **http://ir.unishivaji.ac.in:8080/jspui/** या लिंकवर पाहता येईल.



> या दोन्ही उपक्रमांतील माहितीचा साठा हा संशोधकांसह प्रत्येक घटकासाठी अत्यंत उपयुक्त स्वरुपाचा आहे.संशोधनासह येथील घडामोडींची ऐतिहासिक तसेच अद्ययावत आणि विश्वासार्ह माहिती जगाच्या पाठीवरुन कोठूनही पाहता येणार आहे.
>
> - डॉ. देवानंद शिंदे, - कुलगुरु,शिवाजी विद्यापीठ

शिव-ज्ञानसागर रिपॉझिटरीमध्ये तज्ज्ञ प्राध्यापक, संशोधक आणि पदाधिकारी यांनी संशोधनपर लेख, संशोधन अहवाल यांच्या स्वरुपात निर्माण केलेली माहिती इत्यादींचा समावेश आहे. यांसह प्रश्नपत्रिका संच, अभ्यासक्रम, विविध कार्यक्रमांची छायाचित्रे, विद्यापीठाची प्रकाशने, इत्यादींविषयीची माहिती डिजिटल स्वरुपात उपलब्ध करण्यात येणार आहे.

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या गांधीनगरस्थित इन्फ्लिबनेट सेंटरतर्फे नुकताच इंडियन रिसर्च इन्फर्मेशन नेटवर्क सिस्टीम (आय.आर.आय.एन.एस.) हा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. हा प्रकल्पhttp://unishivaji.irins.org या लिंकच्या स्वरुपात बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे शिवाजी विद्यापीठाच्या वेबसाईटवर आज, सोमवारी लॉंच करण्यात येणार आहे.

# बिरसा मुंडा यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : जननायक बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या स्मृतींना शुक्रवारी अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, संत तुकाराम अध्यासनाचे डॉ. नंदकुमार मोरे, उपकुलसचिव डॉ. नीलेश बनसोडे, आदी उपस्थित होते.

# विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त आज विविध उपक्रम

कोल्हापूर टाइम्स टीम

'शिवाजी विद्यापीठाचा ५७वा वर्धापनदिन सोमवारी (ता. १८ नोव्हेंबर) साजरा होत आहे. यावर्षी काही विशेष पुरस्कारांच्या माध्यमातून उल्लेखनीय योगदानाला विद्यापीठ कौतुकाची थाप देणार आहे. विद्यापीठातील नव्या संकल्पनांची नांदी या वर्षभरात करण्यात येणार आहे' अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ.

> **५८ व्या वर्षात पदार्पण; नव संकल्पनांची नांदी**

डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर आदी उपस्थित होते.

सकाळी साडेआठ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात वर्धापनदिन कार्यक्रम होणार आहे. यावेळी नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी डॉ. शिंदे भूषविणार आहेत. विद्यापीठातील एका अधिविभागाला उत्कृष्ट अधिविभाग पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. यासाठी दहा लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येणार असून बक्षीसाच्या रकमेचा उपयोग अधिविभागातील आवश्यक गोष्टींवर खर्च करायचा आहे. यावेळी गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवक, महाविद्यालयातील गुणवंत प्राचार्य, शिक्षक, सेवक, गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. बॅ. पी. जी. पाटील व प्राचार्या सुमती पाटील स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार, प्रशासकीय गुणवत्ता अभियान पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. मुख्य प्रवेशद्वारासमोरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या छोट्या प्रतिकृतीचे अनावरण वर्धापनदिनाच्या औचित्याने होणार असून विद्यापीठात येणाऱ्या मान्यवरांना ही मूर्ती भेट स्वरुपात देण्यात येणार आहे.

याबाबत कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठाने गेल्या ५७ वर्षात मोठे काम केले आहे. वर्धापनदिनाच्या निमित्ताने गुणवंतांना पुरस्कार देण्यात येणार आहेत. विद्यापीठाच्या नव्या बॅचचे अनावरण करण्यात येणार आहे.'



शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा वर्धापनदिन आज साजरा होत आहे. यानिमित्ताने विद्यापीठाची इमारत नेत्रदीपक विद्युत रोषणाईने उजळली आहे.

## दृष्टिक्षेपात विद्यापीठ

| | | |
|---|---|---|
| २९३ महाविद्यालये | १३ संशोधन संस्था | १४ अभ्यास व संशोधन केंद्र |
| १० अध्यासने | ३ लाख विद्यार्थीसंख्या | १२ स्वायत्त महाविद्यालये |
| १७ हजार दूरशिक्षण विभागातील विद्यार्थीसंख्या | | ३३ एकूण अधिविभाग |



## बॉटॅनिकल गार्डनमध्ये भटकंतीची संधी

देशातील काही मोजक्या विद्यापीठांत लीड बॉटॅनिकल गार्डन आहेत. त्यात शिवाजी विद्यापीठाच्या गार्डनचा समावेश आहे. ४७ एकर जागेत विस्तारलेल्या लीड बॉटॅनिकल गार्डनमध्ये एक हजारहून दुर्मीळ वनस्पतींचे संवर्धन करण्यात आले आहे. दर महिन्याला गार्डनमध्ये वॉकचे आयोजन विद्यापीठातर्फे केले जाणार आहे. लीड गार्डनमधील वनस्पती जवळून पाहता याव्यात, त्यांची माहिती मिळावी यासाठी हा उपक्रम होणार आहे. दर महिन्याच्या पहिल्या रविवारी ही भटकंती करण्यासाठी गार्डन खुले ठेवण्यात येणार असून नाममात्र शुल्कात जैवविविधतेची माहिती देण्यात येणार आहे.

## विद्यापीठाची भरारी

- सामाजिक समस्यांसाठी त्रयस्थ पाहणी अहवालातून ४० लाखांची कमाई
- लोकसहभाग निधीतून आर्थिक दुर्बल गटातील विद्यार्थिनींसाठी बसपास योजनेसाठी पुढाकार
- अधिकार मंडळांच्या बैठकांचे काम ऑनलाइन
- शिक्षक व संशोधक विद्यार्थ्यांसाठी रिसर्च सेन्सिटायझेशन ग्रँट योजना कार्यान्वित
- परीक्षा विभागातर्फे एसआरपीडी मोडद्वारे सुरक्षित प्रश्नपत्रिका वितरण तंत्र
- जलयुक्त विद्यापीठ योजनेतून पावसाच्या पाण्याचा यशस्वी उपयोग
- ॲकॅडमी फॉर ॲडमिनिस्ट्रेटर्स कक्षाची स्थापना
- महारोजगार मेळाव्यातून ६ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण
- एच इंडेक्समध्ये पहिल्या १०० संस्थांमध्ये स्थान
- सायबर सिक्युरिटी अँड डाटा सायन्स कक्षामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर झेप
- नॅसकॉमतर्फे चार महिन्यात ५०० शिक्षकांना प्रशिक्षण
- इन्क्युबेशन सेंटरद्वारे उद्योजक घडवणाऱ्या मोहिमेतून दोन हजार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन
- कोल्हापुरी चप्पल क्लस्टर योजनेसाठी प्रत्यक्ष काम सुरू

# अन् शिवाजी विद्यापीठ स्थापन झाले



■ उदय धारवाडे

शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेस आज (सोमवार) ५७ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त विद्यापीठाच्या स्थापनेदरम्यानच्या काही घडामोडींना दिलेला उजाळा...

१९६० च्या दशकाच्या सुरुवातीला दक्षिण महाराष्ट्रात एक नवे प्रादेशिक विद्यापीठ स्थापन व्हावे, त्या विद्यापीठाला प्राचार्य डॉ. बाळकृष्ण यांच्या इच्छेनुसार छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव द्यावे, असे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळामध्ये ठरले. त्यानुसार विद्यापीठाचे स्वरूप निश्चित करण्यासाठी एक चिकित्सा समिती नेमण्यात आली.

### विद्यापीठाच्या नावाबाबत मतभेद

डॉ. बाळकृष्ण यांच्या इच्छेनुसार छत्रपती शिवरायांचे नाव विद्यापीठाला द्यायचे याबाबत कोणाचीही हरकत नव्हती. विद्यापीठाच्या कायद्यासंबधीही मतभेद नव्हते, पण नाव कोणत्या पद्धतीने द्यायचे याबाबत चिकित्सा समितीमध्ये मतभेद होते, समितीमधील काही सदस्यांना विद्यापीठाचे नाव 'श्री छत्रपती शिवाजी विद्यापीठ' ठेवावे असे वाटत होते. या आग्रहामध्ये कोल्हापूरचे पाहिले आमदार बळवंतराव बराले हेही होते. त्यांनी सतत दोन-तीन दिवस तसा आग्रह धरला त्यांच्या या भूमिकेला समर्पक असे कोणी उत्तर दिले नव्हते. शेवटी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी त्यांना चेंबरमध्ये बोलावले आणि सांगितले की, 'तुम्ही असा आग्रह धरू नका. कारण बडोद्याच्या महाराजा सयाजीराव युनिव्हर्सिटीचा उल्लेख लोकांच्या तोंडी नेहमी एम. एस. युनिव्हर्सिटी असाच असतो. तसेच आपल्या श्रीमती नाथीबाई दामोदर ठकारसी विद्यापीठाचा उल्लेख ही लोक नेहमीच एस. एन. डी. टी. विद्यापीठ असाच करतात तसे आपल्या विद्यापीठाचे होऊ नये. 'शिवाजी विद्यापीठ' या नावानेच सतत उल्लेख झाला तर शिवाजी हे नाव लोकांच्या सतत डोळ्यासमोर राहील. शिवाय एवढ्याच नावामुळे आपण दुसऱ्या कोणाच्या नावाने हे विद्यापीठ सुरू करत असे मानण्याचे कारण नाही. या नावातही श्री छत्रपती शिवाजी विद्यापीठ असे सूचित होते.'

मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हुशार होते. त्यांचा हा युक्तिवाद इतका बिनतोड होता की, त्या आग्रही सदस्यांनी एकदम माघार घेऊन त्यांची सूचना मान्य केली. कोणत्याही कारणामुळे अशी ही गोष्ट कोणाच्या लक्षात आली नाही, अशाप्रकारे विद्यापीठाचे नाव 'शिवाजी विद्यापीठ' असे निश्चित करण्यात आले.

आज विचार केला तर ६० वर्षांपूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी केलेली सूचना आणि युक्तिवाद योग्य होता असे वाटते. नाहीतर आज शिवाजी विद्यापीठाचा उल्लेख संक्षिप्त शब्दात एस. सी. एस. युनिव्हर्सिटी असा झाला असता, त्यामुळे मूळ उद्देशालाच छेद गेला असता. कारण आजकाल आपण पाहत आहोत की, नावाचे तर संक्षिप्तकरण होत आहेच, त्याचबरोबर वाक्यरचनेतसुद्धा होतं आहे. अलीकडे काही राजकीय पक्ष आणि संघटना शिवाजी विद्यापीठाच्या नावात बदल करावा अशी मागणी करत आहेत, पण त्यांनी यशवंतराव चव्हाण यांनी केलेल्या सूचना, युक्तिवाद लक्षात घ्यावा आणि पुढील काळात शिवरायांचे नाव नजरेआड होईल अशी मागणी करू नये.

### विद्यापीठाच्या जागा निवडीचा प्रश्न

विद्यापीठासाठी दक्षिण महाराष्ट्रात जागा निवडली जाणार होती. यशवंतराव चव्हाण यांनी साताऱ्यात, तर वसंतदादा पाटील यांनी सांगलीत हे विद्यापीठ स्थापन व्हावे असा प्रस्ताव कॅबिनेट मिटिंगमध्ये ठेवला होता, त्यामध्ये कोल्हापूरचे नाव नव्हते. त्या मिटिंगच्या दिवशी खमक्या मंत्री असा ज्यांचा आजही उल्लेख केला जातो असे तत्कालीन शिक्षणमंत्री बाळासाहेब देसाई यांची प्रकृती बरी नव्हती. ते बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल होते तरी पण ते शॉल अंगावर घेऊन कॅबिनेट मिटिंगमध्ये गेले आणि ठणकावून बोलले, 'कोल्हापूरची शाहू महाराजांनी केलेली शैक्षणिक प्रगती, कार्य, तेथील बोर्डिंग्ज हे पाहता कोल्हापूर ही पुण्यानंतरची विद्यानगरी आहे, कुठला सातारा आणि सांगली घेऊन बसलाय?', मग यशवंतराव चव्हाण आणि वसंतदादा पाटील यांनी हे मान्य केले आणि अशाप्रकारे शिवाजी विद्यापीठाची स्थापना कोल्हापूरमध्ये करण्याचे ठरले.

# संशोधनप्रकल्प एका क्लिकवर

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या 'शिव-ज्ञानसागर : इन्स्टिट्यूशनल रिपॉझिटरी ऑफ शिवाजी युनिव्हर्सिटी' आणि 'इंडियन रिसर्च इन्फॉर्मेशन नेटवर्क सिस्टीम' (आय.आर.आय.एन.एस.) या दोन महत्त्वाच्या उपक्रमांचे उद्घाटन नांदेड विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या ५७व्या वर्धापन दिनानिमित्त सोमवारी (ता.१८) हा कार्यक्रम होणार आहे.

## 'शिव-ज्ञानसागर', संशोधक माहिती प्रणालीचे आज उद्घाटन

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांनी दिलेल्या माहितीनुसार, या रिपॉझिटरीमध्ये विद्यापीठाच्या विविध कार्यक्रमांची छायाचित्रे, वार्षिक अहवाल, विद्यापीठाची अन्य प्रकाशने, दीक्षान्त संबोधने, अन्य विविध प्रमुख कार्यक्रमांतील भाषणे, विविध परीक्षांच्या प्रश्नपत्रिका, अधिविभागातील संशोधकांचे शोधनिबंध व प्रकाशने, आदी सर्व नवी-जुनी माहिती साठवून ठेवता येईल आणि ती जगाच्या पाठीवरून कुठूनही मिळविणे शक्य होईल. ही माहिती विद्यापीठाच्या http://ir.unishivaji.ac.in:8080/jspui/ या लिंकवर पाहता येईल.

या प्रकल्पाच्या माध्यमातून विद्यापीठातील सुमारे १६९ शिक्षकांची रिसर्च प्रोफाइल्स जगाला एकाच व्यासपीठावर पाहायला मिळणार आहेत. 'नॅक'च्या दृष्टीने ही बाब फार महत्त्वाची आहे. या प्रणालीद्वारे प्राध्यापक, शास्त्रज्ञ व संशोधक विद्यार्थी यांचे संशोधनामधील विद्वत-संवादाचे कार्य दर्शविता येणार असून, विद्वत-नेटवर्क तयार करण्याची संधी मिळणार आहे. केलेल्या संशोधनाची माहिती मुद्रित व आलेख स्वरूपात उपलब्ध होते. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याला केंद्रीय मंत्रालयाने 'नॅशनल मिशन ऑन एज्युकेशन थ्रू आयसीटी' अंतर्गत मान्यता दिली आहे. या प्रणालीद्वारे विद्यापीठातील ३२ अधिविभागांतील १६७ शिक्षकांचे सुमारे २६१३ प्रकाशित शोधनिबंध, ५ इतिवृत्ते, एक पुस्तकातील प्रकरण, नऊ ग्रंथ, २८३८ तज्ज्ञ स्रोत, ६६३७८ सायटेशन्स तसेच २१० अन्य संशोधकीय माहिती उपलब्ध आहे.

## प्रकल्पाची वैशिष्ट्ये

- भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रातील सर्व शैक्षणिक व संशोधन संस्थांना सामायिक व्यासपीठ म्हणून वापर करता येईल.
- स्वतंत्र व्यक्ती, विभाग, शाळा, संस्था यांचे 'संशोधन केंद्र साधन' म्हणून कामगिरी बजावेल.
- मनुष्यबळ व्यवस्थापन, अभ्यासक्रम व अनुदान पद्धती, तसेच ऑर्सिड, स्कोपस, गुगल स्कॉलर, रिसर्चर यावरील संशोधकांचा डाटा घेऊन ही प्रणाली अधिकाधिक सक्षम व विश्वासार्ह असेल.
- उपलब्ध तंत्रज्ञान, संशोधनांची क्षेत्रे, संशोधनातील अंतर ओळखणे व त्या अनुषंगाने संशोधन निधीवर त्यांचे धोरण परिभाषित करण्यासाठी धोरण निर्मिती व सरकारचा महत्त्वाचा साधनस्रोत म्हणून याचा वापर केला जाऊ शकतो.

> रिसर्च इन्फॉर्मेशन नेटवर्क सिस्टीम आणि 'शिव-ज्ञानसागर' या दोन्ही उपक्रमांतील माहितीचा साठा हा संशोधकांसह प्रत्येक घटकासाठी अत्यंत उपयुक्त आहे. विद्यापीठातील संशोधनासह येथील घडामोडींची ऐतिहासिक तसेच अद्ययावत आणि विश्वासार्ह माहिती जगात कोठूनही पाहता येणे शक्य होणार आहे. यासाठी परिश्रम घेणाऱ्या ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे काम स्तुत्य आहे.
>
> – डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ



8 NOV 2019

"नवभारत"

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर

57वें स्थापना दिवस पर विशेष



# शिवाजी विश्वविद्यालय

## पश्चिम महाराष्ट्र की ज्ञानपंढरी

**'ज्ञानमेवामृतम' ब्रीद वाक्य को लेकर दक्षिण महाराष्ट्र में उच्चशिक्षा की जरूरत को पूरा करने के लिए पिछले करीब 56 वर्षों से कोल्हापुर का शिवाजी विश्वविद्यालय कार्यरत है. 18 नवंबर 1962 को कोल्हापुर में शिवाजी विश्वविद्यालय की स्थापना की गई. समाज के गरीब तबके के बच्चों तक शिक्षा का प्रवाह पहुंचे, इस उद्देश्य से पहले कुलगुरु डॉ. अप्पासाहेब पवार ने विश्वविद्यालय की बागडोर संभालकर कामकाज की शुरुआत की. इस विश्वविद्यालय का उद्देश्य वैसे तो दक्षिण महाराष्ट्र के कोल्हापुर, सांगली, सातारा, सोलापुर तथा सिंधुदुर्ग जिलों में उच्च शिक्षा दिलाने का था. इस विश्वविद्यालय की स्थापना केवल संस्थात्मक स्वरूप में नहीं थी. इसके पीछे एक बड़ा शैक्षणिक और सामाजिक उद्देश्य भी था.**



डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरु

शिवाजी विश्वविद्यालय की स्थापना के लिए छत्रपति राजाराम महाराज, डॉ. बालकृष्ण, पूर्व मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, बालासाहब देसाई, डॉ. सी. रा. तावडे जैसे महानुभावों ने काफी योगदान दिया. इन सभी ने शिक्षा बहुजन समाज के हर एक व्यक्ति तक पहुंचे इसके लिए अथक प्रयास किए. इसकी झलक विश्वविद्यालय के पहले दीक्षांत समारोह में दिखी थी. इस समारोह के लिए पूर्व मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण द्वारा तत्कालीन कुलपति को भेजे गए संदेश में 'ज्ञान के माध्यम से मेधावी बनें' इस तरह का संदेश दिया था. इससे उनकी इस विश्वविद्यालय के प्रति आस्था दिखाई देती है.

कोल्हापुर और परिसर में छात्रों की आर्थिक स्थिति की विश्वविद्यालय प्रशासन को पहले से अच्छी समझ थी, जोकि आज भी कायम है. पैसों की तंगी के चलते कोई भी छात्र शिक्षा के अवसर से दूर ना रहें, इसके लिए काफी कम कीमत पर छात्रों को यहां शिक्षा की सुविधा रहती है. जिन आर्थिक दृष्टि से अति पिछड़े छात्रों को यह शुल्क भी भरना संभव नहीं होता, ऐसे छात्रों के लिए विश्वविद्यालय की ओर से 'अर्न एण्ड लर्न', 'जरुरत के हिसाब से काम' तथा 'शिवाजी विश्वविद्यालय छात्रवृत्ति' ऐसे अभिनव उपक्रम चलाए जाते हैं. शिक्षा की चाह रखने वाले छात्रों को विश्वविद्यालय में निःशुल्क निवास और आहार का प्रबंध भी किया जाता है. बीते पांच दशकों में इस योजना का सैकड़ों छात्रों को लाभ हुआ, जोकि आज अपने करियर में सफलता के मार्ग पर अग्रसर हैं. शिवाजी विश्वविद्यालय के आज तक के कार्यकाल की समीक्षा हम करें,तो इसके तीन प्रमुख चरण हमें दिखाई देते हैं. प्रथम चरण है शिक्षा के अवसर और विस्तार कार्यक्रम का. इस कार्यक्रम के लिए विश्वविद्यालय की ओर से काफी प्रयास किए गए. समाज के सभी तबकों तक पहुंचने के लिए जहां आवश्यक है वहां महाविद्यालयों का निर्माण किया गया. विश्वविद्यालय के विकास का दूसरा चरण विश्वविद्यालय के रजत महोत्सवी वर्ष के आस-पास से शुरू हुा. इस चरण में विश्वविद्यालय ने अध्ययन-अध्यापन पद्धति समेत अनुसंधान पर जोर दिया. पहले विश्वविद्यालय में अनुसंधान के अवसर काफी कम होते थे. लेकिन बाद में विज्ञान फैकल्टी समेत सामाजिक विज्ञान फैकल्टी में भी अनुसंधान होने की दृष्टि से विश्वविद्यालय ने योजनाएं बनाई और उसे अमल में लाया. शिक्षा के उपक्रमों को अनुसंधान से जोड़ने के चलते शिक्षापूरक कार्य का काफी विस्तार हुआ. इस पूरी प्रक्रिया में शिक्षा के पार जाने की चाह रखने वाले विभिन्न समाजघटक विश्वविद्यालय से जुड़ गए. तीसरा चरण है व्यावसायिक शिक्षा विकास का. राज्य के पूर्व मुख्यमंत्री स्व. वसंतदादा पाटिल की दूरदृष्टी से राज्य में व्यावसायिक शिक्षा के अवसर बड़ी संख्या में उपलब्ध हुए. अभियांत्रिकी, फार्मसी इन फैकल्टियों के साथ ही बीटेक, एमटेक, बायो-टेक्नोलॉजी, नैनो-टैक्नोलॉजी, माइक्रो-बायोलॉजी ऐसी अत्याधनिक व्यवसायाधारित शिक्षा शाखाओं का विकास विश्वविद्यालय में किया गया. इस नीति के नतीजे में विश्वविद्यालय के विभिन्न इंजीनियरिंग कॉलेजों से बेहतरीन अभियंता डिग्री लेकर देश की सेवा में कार्यरत हुए. इन महाविद्यालयों से निकले अभियंते आज विभिन्न राष्ट्रीय, बहुराष्ट्रीय कंपनियों में देश-विदेशों में काम कर रहे है. इस तरह से शिक्षा, अनुसंधान तथा गुणवत्ता विकास के बलबूते विश्वविद्यालय आज प्रगति कर रहा है.

संस्थात्मक शिक्षा के आगे जाकर विश्वविद्यालय ने दूरस्थ शिक्षा के संदर्भ में काफी काम किया. समाज के जो भी घटक शिक्षा के प्रवाह से दूर चले गए हैं या वंचित रह गए हैं, ऐसे सभी लोगों को उच्च शिक्षा दिलाने की दृष्टि से शुरू हुई यह पहल आने वाले समय में काफी रंग लाई. इस उपक्रम के चलते विश्वविद्यालय से जूड़ने वालों की संख्या काफी बढ़ गई. विश्वविद्यालय द्वारा शुरू किया गया 'हर मांगने वाले को काम' यह उपक्रम भी काफी कारगर साबित हुआ. विश्वविद्यालय के सर्वांगीण विकास के लिए शैक्षणिक सुधार, प्रशासकीय सुधार और परीक्षा पद्धति में सुधार किए गए. इसमें सभी संलग्नित महाविद्यालयों में सेमिस्टर पद्धति, महाविद्यालयों के संलग्निकरण, विस्तारीकरण के संदर्भ में नियमावली तथा संलग्निकरण की फीस में सुधार किए गए. इसके अलावा. एमफील, पीएचडी के ऑनलाईन आवेदनों की स्वीकृति, पंचवार्षिक प्रारूप निश्चिति, इंटरनेशनल सेल की पुनर्रचना, इंटर्नल क्वालिटी एश्युरन्स सेल, प्लेसमेंट सेल तथा लीड कॉलेज का मजबूतीकरण किया गया. कमजोर महाविद्यालयों को वित्तीय मदत देते हुए 'विकर कॉलेज स्कीम' चलाई गई. इन सभी योजनाओं के चलते महाविद्यालय मजबूत हुए, जिससे विश्वविद्यालय के रिजल्ट में काफी सुधार हुआ. महाविद्यालयों को 'नैक' का प्रमाणपत्र मिलने की संख्या बढ़ गई. साथ ही ज्यादातर महाविद्यालयों में नैक पुनर्मूल्यांकन के स्तर में सुधार हुआ. शिवाजी विश्वविद्यालय ने अपने पांच दशकों के कार्यकाल में सामाजिक उत्थान का काफी ध्यान रखा, जिससे विश्वविद्यालय की ख्याति पूरे देश में पहुंची. 1962 से लेकर 1975 तक पहले कुलगुरु डॉ. अप्पासाहेब पवार के मार्गदरर्शन में कला, वाणिज्य, विज्ञान इन तीन मूलभूत शाखाओं में शिक्षा की मजबूत नींव रखी गई. अप्पासाहब के बाद उन्हीं की तरह बेहतरीन काम करने वाले प्राचार्य पी. जी. पाटिल विश्वविद्यालय के कुलगुरु बने. तिसरे कुलगुरु के तौर पर अर्थशास्त्र के अभ्यासक प्राचार्य बी. एस. भणगे कामकाज देखा. तत्पश्चात प्राचार्य आर. के. कणबरकर, प्राचार्य के. भोगिशयन ने भी विश्वविद्यालय के विकास में अपना अहम योगदान दिंया.

विश्वविद्यालय में विभिन्न प्रकल्प चलाए गए. विश्वविद्यालय में विभिन्न सम्मेलन, परिषद तथा चर्चासत्रों का आयोजन किया, जिससे छात्रों को जानकारी मिली. विदेश में शिक्षा प्राप्त कर चुके विश्वविद्यालय के कुछ पूर्व छात्रों को ही शिवाजी विश्वविद्यालय में काम करने का अवसर प्राप्त हुआ. इससे दो लाभ हुए. एक तो उनमें विश्वविद्यालय के प्रति के अनोखी चाह थी. उन्होंने पूरी संजीदगी से ज्ञानदान का काम किया. दूसरा यह कि ऐसे शिक्षकों की ओर से विश्वविद्यालय के छात्रों को विदेश में शिक्षा प्राप्त करने के लिए जाने का अवसर प्राप्त हुआ. उन छात्रों ने विदेश में जाकर एक श्रृंखला तैयार कर अपने विश्वविद्यालय के छात्रों को काफी मदद की. प्रा. के. बी. पोवार के पश्चात पहली बार विश्वविद्यालय के अधिविभाग के शिक्षकों में से अप्पासाहब वरुटे को कुलगुरु बनाया गया. महाराष्ट्र विश्वविद्यालय कानून 1994 के लागू होने के बाद समाजशास्त्र के अभ्यासक प्रा. डॉ. डी. एन. धनागरे ने कुलगुरु के तौर पर कामकाज संभाला.

## कुलगुरु के नेतृत्व में प्रगति की ओर विश्वविद्यालय

तत्पश्चात पुणे विश्वविद्यालय के भौतिकशास्त्र विभाग के प्राध्यापक एम. जी. ताकवले ने कामकाज संभाला. तब तक विश्वविद्यालय ने उच्च शिक्षा तथा तकनीकी शिक्षा के क्षेत्र में कदम रखा था. विश्वविद्यालय में 10वें कुलगुरु के तौर पर मुंबई की विज्ञान संस्था के संचालक प्रा. एम. एम. सालुंखे ने कामकाज हाथ में लिया. नैक विश्वविद्यालय को 'अ' मानांकन दिलाने के काम की नींव भी सालुंखे ने ही रखी. विभिन्न देशों के विश्वविद्यालयों के साथ सामंजस्य करार करने, छात्रों का आदान-प्रदान करना, उन्हें विभिन्न तरह की सुविधाएं दी गई. प्रा. सालुंखे के कार्यकाल में पहली बार छात्र विदेश में घूमने गए. विश्वविद्यालय के ग्यारहवे कुलगुरु के तौर पर प्रा. डॉ. एन. जे. पवार ने कामकाज संभाला. उनके कार्यकाल में विश्वविद्यालय ने श्रीलंका, थाइलैंड, ऑस्ट्रेलिया, दक्षीण कोरिया, फ्रान्स, कैनडा, युक्रेन, ब्राजील, जापान, ताइवान, त्रिनिदाद, नाइजेरिया, क्युबा, इटली जैसये देशों से अनुसंधान करार किए. वैचारिक, शैक्षणिक और अनुसंधानात्मक कार्य में आदान-प्रदान बढ़ा. उनके कार्यकाल में राज्य में विश्वविद्यालय को 'नैक' की ओर से सबसे अधिक 3.16 अंकों के साथ 'अ' ग्रेड प्राप्त हुआ. इससे शिवाजी विश्वविद्यालय का नाम राज्य के अग्रणी विश्वविद्यालयों में शामिल हो गया.विद्यमान कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे ने बारहवें कुलगुरु के तौर पर कामकाज संभाला, तभी से उन्होंने अपने पूर्ववर्ती सभी दिग्गज कुलगुरुओं के कार्य को जारी रखा. उनके कार्यकाल में शिवाजी विश्वविद्यालय को आईएसओ 9001:2015 से प्रमाणित किया गया. प्रशासकीय कामकाज के स्टैंडर्डायजेशन करने की दिशा में विश्वविद्यालय ने काफी काम किया. इससे पहले पिछले वर्ष विश्वस्तर पर शैक्षणिक संस्थाओं के मूल्यांकन के लिए विख्यात 'क्यूएस वर्ल्ड यूनिवर्सिटी' रैंकिंगमें भारत के सभी शिक्षा संस्थानोंकी सूची में शिवाजी विश्वविद्यालय की रैंकिंग 50-60 की है. साथ ही 'ब्रिक्स' देशों के शैक्षणिक संस्थाओं रैंकिंग में 251-260 है. यह सभी बातें विश्वविद्यालय के उत्कृष्टता का प्रमाण साबित करती है. विद्यमान कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे को पुणे के सावित्रीबाई फुले विश्वविद्यालय, मुंबई विश्वविद्यालय तता डॉ. बाबासाहब आंबेडकर मराठवाडा विश्वविद्यालय में कुरगुरु के तौर पर काम करने का अनुभव हासिल है.विभिन्न देशों के विश्वविद्यालयों के साथ सामंजस्य करार किया गया है.

## जलयुक्त विद्यापीठ योजना शुरू

विश्वविद्यालय के सभी कामकाज कम्प्युटरीकृत किया गया. विश्वविद्यालय ने अनुसंधान नीति को बढ़ावा देने के लिए रिसर्च सेन्सिटायजेशन स्कीम, विश्वविद्यालय एवं व महाविद्यालयीन शिक्षकों के लिए रिसर्च इनिसिएशन स्कीम, रिसर्च स्ट्रेन्दनिंग स्कीम, रिसर्च प्रमोशन स्कीम, रिसर्च एप्रिसिएशन स्कीम, शिक्षक, विद्यार्थी एवं रिसर्च गाईड के लिए बेस्ट रिसर्चर पुरस्कार, बेस्ट परफॉर्मिंग डिपार्टमेंट स्कीम, अनुसंधानकर्ता छात्रों के लिए वित्तीय मदद योजना, आईपीआर एवं पेटंट फाइलिंग के लिए सहायता, मानव्यविद्या एवं सामाजिक शास्त्रों के उत्तम अनुसंधान के लिए विदेशी भाषाओं के अनुवाद के लिए अनुदान योजना, डॉक्टरल एवं पोस्ट डॉक्टरल कार्यक्रमों के लिए वित्त सहाय्य योजना ऐसे विभिन्न उपक्रम शुरू किए.विश्वविद्यालय संलग्नित महाविद्यालयों में 400 से अधिक कौशल प्रदान केंद्र चला रहा है. विश्वविद्यालय में 150 प्रशिक्षित ट्रेनर्स कार्यरत है. उन्होंने आज तक दो लाख लोगों को विभिन्न कौशल सिखाए हैं. समय की मांग को देखते हुए विश्वविद्यालय में शिवाजी सेंटर फॉर इनोवेशन, इनक्युबेशन एन्ड लिंकेजिस समेत तीन इनक्युबेशन केंद्र शुरू किए गए है. साथ ही विश्वविद्यालय से जुड़े 21 कॉलेजों में भी यह केंद्र कार्यान्वित किए गए हैं. विश्वविद्यालय में सेक्शन-8 कंपनी स्थापन की गई है. इसके तहत मुख्य कार्यकारी नियुक्त किया गया है. फैकल्टी डेवलपमेंट सेंटर फॉर साइबर सिक्युरिटी एन्ड डाटा साइन्सेस (MHRD) और 'रुसा' अंतर्गत सेंटर फॉर नैचुरल्स प्रोडक्ट्स एन्ड अल्टरनेटिव मेडिसीन, रिसोर्स सेंटर फॉर इन्क्लुजिव एजुकेशन, सेंटर फॉर व्हीएलएसआई सिस्टीम डिजाईन, सेंटर फॉर नैनो-फॅब्रिक्स, स्पोर्ट्स फैसिलिटी एन्ड इन्फ्रास्ट्रक्चर, स्टैटिस्टिक्स रिसर्च लैब समेत भाभा न्युक्लियर अनुसंधान केंद्र की पर्यावरणीय तरंग नापने की आयर्मोन सुविधा, राजीव गांधी विज्ञान एव तकनिकी केंद्र के तहत गुड़ गुणवत्ता जांच केंद्र, सेंटर फॉर स्कील एन्ड आंत्रप्रिन्युअरशीप डेवलपमेंट, सेंटर फॉर लीडरशीप डेवलपमेंट, सेंटर फॉर करिअर गाइडन्स एन्ड सायकॉलॉजिकल काउन्सिलिंग, सेंटर फॉर एक्सलन्स इन सेरिकल्चर, सेंटर फॉर एक्सीलन्स इन एपिकल्चर, सेंटर फॉर एक्सलन्स इन टिश्यू-कल्चर, 'आयजीटीआर' के एडवान्स्ड टेक्नोलॉजी सेंटर केंद्रों की स्थापना की गई. जर्मनी के होश्युल हैनोवर युनिवर्सिटी ऑफ अप्लाईड साइन्सेस ऑफ आर्ट्स इस विश्वविद्यालय के सहयोग से बायोकेमेस्ट्री विभाग के एमएस्सी, मेडिकल इन्फॉर्मेशन मैनेजमेंट का पाठ्यक्रम शुरू किया गया. शिंदे के कार्यकाल में 'जलयुक्त विद्यापीठ योजना' महत्वपूर्ण उपक्रम शुरू किया गया.

- डॉ. आलोक जत्राटकर

पुढारी

# संशोधन, अद्ययावत घडामोडी आता एका क्लिकवर!

## शिवाजी विद्यापीठ : शिव-ज्ञानसागर, संशोधक माहिती प्रणालीचे आज उद्घाटन







**कोल्हापूर : प्रतिनिधी**

'शिव-ज्ञानसागर : इन्स्टिट्यूशनल रिपॉझिटरी ऑफ शिवाजी युनिव्हर्सिटी' व 'इंडियन रिसर्च इन्फॉर्मेशन नेटवर्क सिस्टिम' हे नावीण्यपूर्ण उपक्रम शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापनदिनी सुरू होत आहेत. यामुळे विद्यापीठातील संशोधनासह येथील घडामोडींची ऐतिहासिक व अद्ययावत माहिती जगाच्या पाठीवरून कोठूनही एका क्लिकवर पाहता येणे शक्य होणार आहे. या दोन्ही प्रणालींचे उद्घाटन आज (सोमवार) होणार आहे.

**शिव-ज्ञानसागर : इन्स्टिट्यूशनल रिपॉझिटरी ऑफ शिवाजी युनिव्हर्सिटी**

विद्यापीठाच्या सर्व अधिविभागांतील विषयतज्ज्ञ व संशोधक विद्यार्थी यांनी डिजिटल स्वरूपात निर्माण केलेल्या बौद्धिक संपदेचे संघटन, व्यवस्थापन, संप्रेषण व जतन करणे याला 'इन्स्टिट्युशनल रिपॉझिटरी' म्हणतात. रिपॉझिटरीमध्ये विविध कार्यक्रमांची छायाचित्रे, वार्षिक अहवाल, प्रकाशने, दीक्षान्त संबोधने, विविध परीक्षांच्या प्रश्नपत्रिका, अधिविभागातील संशोधकांचे शोधनिबंध व प्रकाशने आदी सर्व नवी-जुनी माहिती साठवून ठेवता येईल. ही माहिती विद्यापीठाच्या http://ir.unishivaji.ac.in:8080/jspui/ या लिंकवर पाहता येईल.

विद्यापीठातील बौद्धिक संशोधनास जागतिक व्यासपीठ पुरविणे, एकाच मध्यवर्ती ठिकाणी सर्व कंटेंट डिजिटल स्वरूपात एकत्रित करणे, सर्व माहिती मुक्तपणे वापरास उपलब्ध करून देणे आदी उद्दिष्टे रिपॉझिटरीद्वारे साध्य होणार आहेत. विद्यापीठांतर्गत माहितीचा सामूहिक उपयोग, प्राध्यापक व संशोधकांच्या संशोधनाचे परीक्षण व मूल्यांकन त्यांच्या डिजिटल स्वरूपाच्या साहित्याच्या वापरावरून ठरविता येणार आहे.

**इंडियन रिसर्च इन्फॉर्मेशन नेटवर्क सिस्टिम (आय.आर.आय.एन.एस.)**

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या गांधीनगर स्थित 'इन्फ्लिबनेट' सेंटरतर्फे नुकताच इंडियन रिसर्च इन्फॉर्मेशन नेटवर्क सिस्टीम प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. शैक्षणिक, संशोधन संस्था यांच्यासाठी वेब आधारित संशोधन, माहिती व्यवस्थापन, सेवा असे याचे स्वरूप आहे. हा प्रकल्प http://unishivaji.irins.org या लिंकच्या स्वरूपात बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे विद्यापीठाच्या वेबसाईटवर सोमवारी लाँच करण्यात येणार आहे.

प्रकल्पाच्या माध्यमातून विद्यापीठातील सुमारे १६९ शिक्षकांची रिसर्च प्रोफाईल्स या माध्यमातून जगाला एकाच व्यासपीठावर पाहायला मिळणार आहेत. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याला केंद्रीय मंत्रालयाने 'नॅशनल मिशन ऑन एज्युकेशन थ्रू आयसीटी' अंतर्गत मान्यता दिली आहे. प्रणालीत विद्यापीठातील ३२ अधिविभागांतील १६७ शिक्षकांची २६१३ प्रकाशित शोधनिबंध, पाच इतिवृत्ते, नऊ ग्रंथ, २८३८ तज्ज्ञ स्रोत, ६६३७८ सायटेशन्स व २१० अन्य संशोधकीय माहिती उपलब्ध असणार आहे. अशी दोन्ही उपक्रमांची माहिती बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांनी दिली.

**साधनस्रोत म्हणून वापर शक्य**

भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रातील सर्व शैक्षणिक व संशोधन संस्थांना सामायिक व्यासपीठ म्हणून याचा वापर करता येईल. तंत्र व्यक्ती, विभाग, शाळा, संस्थांचे 'संशोधन केंद्र साधन' म्हणून कामगिरी बजावेल. उपलब्ध तंत्रज्ञान, संशोधनांची क्षेत्रे, संशोधनातील अंतर ओळखणे व त्या अनुषंगाने संशोधन निधीवर त्यांचे धोरण परिभाषित करण्यासाठी धोरण निर्मिती व सरकारचा महत्त्वाचा साधनस्रोत म्हणून याचा वापर केला जाऊ शकतो.

> “
> रिसर्च इन्फॉर्मेशन नेटवर्क सिस्टिम व 'शिव-ज्ञानसागर' या दोन्ही उपक्रमांतील माहितीचा साठा हा संशोधकांसह प्रत्येक घटकासाठी उपयुक्त असून विद्यापीठातील संशोधनासह घडामोडींची ऐतिहासिक व अद्ययावत, विश्वासार्ह माहिती कोठूनही पाहता येणे शक्य होणार आहे. विद्यापीठातील बौद्धिक मालमत्तेचे व्यवस्थापन, साठवणूक, जपणूक व जगभरात तिचे वितरण करण्याकरिता 'शिव-ज्ञानसागर'चा वापर उपयुक्त ठरणार आहे.
>
> **- डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू**

संक्षिप्त




## शिवाजी विद्यापीठाचा आज वर्धापनदिन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा वर्धापनदिन समारंभ सोमवारी (दि. १८) सकाळी राजर्षी शाहू सभागृहात सकाळी ८.३० वाजता होणार आहे. स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे कुलगुरू प्रा. डॉ. उद्धव भोसले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे समारंभाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत.

पुढारी

# विद्यापीठात आजपासून कुलगुरू टी-२० क्रिकेट चषक स्पर्धा

## अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कर्मचाऱ्यांची १७ वी स्पर्धा



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात सोमवार (दि. १८) पासून १७ व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धांना प्रारंभ होणार आहे.

नांदेड येथील स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. मधुकरराव गायकवाड यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन दुपारी १ वाजता विद्यापीठाच्या क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुलाच्या मैदानावर होणार आहे. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

देशभरातील २० संघांतील ३६० खेळाडू स्पर्धेत सहभागी होणार असून, दहा दिवसांत ४८ सामने होणार आहेत. स्पर्धेचे सर्व अपडेट विद्यापीठाच्या संकेतस्थळावर देण्यात येणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 NOV 2019

पुण्यनगरी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सोमवारी होणाऱ्या ५७ व्या वर्धापनदिनानिमित्त विद्यापीठाच्या मुख्य इमारतीला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. (छाया : एस. अली)

# विद्यापीठाचा आज वर्धापनदिन

## मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू उद्धव भोसले उपस्थित राहणार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा वर्धापनदिन सोमवार, दि. १८ रोजी राजर्षी शाहू सभागृह येथे साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त आयोजित समारंभाला स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे कुलगुरू प्रा. डॉ. उद्धव भोसले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत, तर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डी. टी. शिर्के आहेत.

कार्यक्रमाअंतर्गत विविध क्षेत्रातील लोकांचा सत्कार केला जाणार आहे. त्यामध्ये गुणवंत शिक्षक, प्रशासन सेवक, गुणवंत प्राचार्य, विद्यापीठ शिक्षक यांना गौरवण्यात येणार आहे. बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक व प्राचार्या सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. कार्यक्रमापूर्वी सकाळी ८.३० वाजता ध्वजवंदन होणार आहे.

### वॉक फॉर बोटॅनिकल गार्डन

शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागाकडून दुर्मीळ स्वरुपातील वनस्पतींचा अभ्यास करण्यासाठी बोटॅनिकल गार्डन साकारण्यात आले आहे. हे सर्वांना पाहता यावे, यासाठी वॉक फॉर बोटॅनिकल गार्डन उपक्रम विद्यापीठामार्फत महिन्याच्या प्रत्येक रविवारी राबवण्यात येणार आहे. याचे उद्घाटन सोमवारी मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

### छत्रपतींची प्रतिकृती भेट

शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याची प्रतीकृती तयार करण्यात आली असून येणाऱ्या प्रत्येक मान्यवरांना ही प्रतिकृती भेट दिली जाणार आहे.

# ‘शिव-ज्ञानसागर प्रणाली’चे आज अनावरण

## विद्यापीठात वर्धापनदिनानिमित्त होणार पुरस्कारांचे वितरण, छायाचित्रण स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा वर्धापन दिन उद्या (ता. १८) आहे. या निमित्ताने बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या शिव-ज्ञानसागर: इन्स्टिट्यूशनल रिपॉझिटरी ऑफ शिवाजी युनिव्हर्सिटी आणि इंडियन रिसर्च इन्फॉर्मेशन नेटवर्क सिस्टीम (आय.आर.आय.एन.एस.) या दोन महत्त्वाच्या प्रकल्पांचे अनावरण होईल. स्वामी रामानंद मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांच्या हस्ते अनावरण करण्यात येणार आहे.**

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांनी दिलेल्या माहितीनुसार, विद्यापीठाच्या सर्व अधिविभागांतील विषयतज्ज्ञ व संशोधक विद्यार्थी यांनी डिजिटल स्वरूपात निर्माण केलेल्या बौद्धिक संपदेचे संघटन, व्यवस्थापन, संप्रेषण आणि जतन करणे यालाच 'इन्स्टिट्यूशनल रिपॉझिटरी' म्हणतात. या रिपॉझिटरीमध्ये विद्यापीठाच्या विविध कार्यक्रमांची छायाचित्रे, वार्षिक अहवाल, विद्यापीठाची अन्य प्रकाशने, दीक्षान्त संबोधने, अन्य विविध प्रमुख कार्यक्रमांतील भाषणे, विविध परीक्षांच्या प्रश्नपत्रिका, अधिविभागातील संशोधकांचे शोधनिबंध व प्रकाशने इत्यादी सर्व नवी-जुनी माहिती साठवून ठेवता येईल आणि ती जगाच्या पाठीवरून कोठूनही मिळविणे



शक्य होईल.

शिव-ज्ञानसागर रिपॉझिटरीमध्ये तज्ज्ञ प्राध्यापक, संशोधक आणि पदाधिकारी यांनी संशोधन लेख, संशोधन अहवाल यांच्या स्वरूपात निर्माण केलेली माहिती असेल. याशिवाय तांत्रिक अहवाल, संशोधनविषयक डेटा, प्रबंध, प्रबंधिका, महत्त्वाचे छापील संग्रह, अध्ययन व अध्यापन वाचन साहित्य, वार्षिक अहवाल, सांख्यिकीय अहवाल, परिषदांचे इतिवृत्त इत्यादींचा समावेश आहे. ही माहिती डिजिटल स्वरूपात उपलब्ध करण्यात येणार आहे. विद्यापीठातील बौध्दिक संशोधनास जागतिक व्यासपीठ पुरविणे, एकाच मध्यवर्ती ठिकाणी सर्व कंटेन्ट डिजिटल स्वरूपात एकत्रित करणे, सर्व माहिती मुक्तपणे वापरास उपलब्ध करून देणे इ. उद्दिष्टे रिपॉझिटरीद्वारे साध्य होणार आहेत. विद्यापीठांतर्गत माहितीचा सामूहिक उपयोग, प्राध्यापक व संशोधकांच्या संशोधनाचे परीक्षण व मूल्यांकन त्यांच्या डिजिटल स्वरूपाच्या साहित्याच्या वापरावरून ठरविता येणार आहे. माहितीची परिणामकारक देवघेव, प्रगत दृष्टिकोन, सार्वजनिक मूल्य इ. अनुषंगिक फायदे या रिपॉझिटरीचे आहेत.

### या प्रकल्पाची वैशिष्ट्ये

- भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रातील सर्व शैक्षणिक व संशोधन संस्थांना सामाईक व्यासपीठ म्हणून याचा वापर करता येईल.
- विद्यमान संशोधन, व्यवस्थापन प्रणाली उदा. मनुष्यबळ व्यवस्थापन, अभ्यासक्रम व अनुदान पद्धती, खुल्या किंवा व्यावसायिक सायटेशन्सचा डाटाबेस, तसेच ऑर्सिड, स्कोपस, गुगल स्कॉलर, रिसर्चर यावरील संशोधकांचा डाटा घेऊन ही प्रणाली अधिकाधिक सक्षम व विश्वासार्ह बनली आहे.
- उपलब्ध तंत्रज्ञान, संशोधनांची क्षेत्रे, संशोधनातील अंतर ओळखणे व त्या अनुषंगाने संशोधन निधीवर त्यांचे धोरण परिभाषित करण्यासाठी धोरण निर्मिती व सरकारचा महत्त्वाचा साधनस्रोत म्हणून याचा वापर केला जाऊ शकतो.

**“ रिसर्च इन्फॉर्मेशन नेटवर्क सिस्टीम आणि शिव-ज्ञानसागर या दोन्ही उपक्रमांतील माहितीचा साठा हा संशोधकांसह प्रत्येक घटकासाठी अत्यंत उपयुक्त आहे. विद्यापीठातील संशोधनासह येथील घडामोडींची ऐतिहासिक तसेच अद्ययावत आणि विश्वासार्ह माहिती जगाच्या पाठीवरून कोठूनही पाहता येणे शक्य आहे. शिवाजी विद्यापीठातील बौद्धिक मालमत्तेचे व्यवस्थापन, साठवणूक, जपणूक व जगभरात तिचे वितरण करण्याकरिता 'शिव-ज्ञानसागर'चा वापर उपयुक्त ठरणार आहे.**

**– प्रा. डॉ. देवानंद शिंदे** (कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ)

# ‘कमवा व शिका’ ठरली आधारवड

## योजनेचे सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण; साडेचार हजार विद्यार्थ्यांचे खुलले व्यक्तिमत्त्व

विनायक लोहार : सकाळ वृत्तसेवा

**उजळाईवाडी, ता. १७ : प्राध्यापक, कुलगुरू ते सरकारी अधिकारी घडवणारी शिवाजी विद्यापीठातील ‘कमवा व शिका योजना’ सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे. काम करून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ती आधारवड ठरली असून, आजपर्यंत सुमारे साडेचार हजार विद्यार्थ्यांनी योजनेतून आपल्या व्यक्तिमत्त्वाला आकार दिला आहे. प्रशासकीय पातळीवर योजनेचा सुवर्णमहोत्सव दिमाखात करण्यासाठी हालचाली सुरू झाल्या आहेत.**

शिवाजी विद्यापीठाची स्थापना १९६२ ला झाली तर पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी १९६८ ला ‘कमवा व शिका’ ही योजना सुरू केली. विद्यापीठाच्या वाटचालीत या योजनेला विशेष महत्त्व आहे. त्याखेरीज विद्यापीठाच्या माहितीला परिपूर्णतेचा साज चढत नाही.



कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर जिल्ह्यांतील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांसाठी ही योजना आहे. विद्यार्थ्यांच्या निवासाची व भोजनाची व्यवस्था भवनमध्ये केली जाते. या भवनच्या इमारतीचा प्लॅन कोणा अनुभवी इंजिनिअरने केलेला नाही. तो वालचंद इंजिनिअरिंग कॉलेजच्या एका विद्यार्थ्याच्या कल्पनेतून आकारास आला आहे. या विद्यार्थी भवनचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन असे नामकरण केले आहे. सुरवातीला योजनेतील विद्यार्थ्यांना शेती, गिरणी, हॉटेल अशा विविधांगी कामांचा अनुभव घ्यावा लागला. सध्या विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना उद्यान विभागात, कला व वाणिज्यच्या विद्यार्थ्यांना कार्यालयीन, झेरॉक्स किंवा ग्रंथालयात पुस्तकांच्या देवघेवीचे काम दिले जाते. आजही योजनेतील प्रवेशासाठी विद्यार्थ्यांच्या अर्जांचा गठ्ठा येतो. निकषानुसार निवडक विद्यार्थ्यांना येथे प्रवेश मिळतो. यंदा ही योजना सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण करत असून, त्यानिमित्त वैविध्यपूर्ण उपक्रमांच्या आखणीसाठी प्रशासकीय पातळीवर हालचाली सुरू झाल्या आहेत.




**शिवाजी विद्यापीठातील डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन.**

### तत्कालीन राष्ट्रपतींची भेट...

योजनेतील विद्यार्थिनींसाठी मुलींच्या वसतिगृहात निवासाची व्यवस्था होते. मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह उभारण्यात आले आहे. तत्कालीन राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी, लोकनेते जयप्रकाश नारायण अशा अनेक नेत्यांनी विद्यार्थी भवनला भेटी दिल्या आहेत.

### कुलगुरू झालेले भवनचे विद्यार्थी

- **प्रा. डॉ. एस. एन. पठाण** (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर),
- **प्रा. डॉ. एस. एच. पवार** (डी. वाय. पाटील विद्यापीठ, कोल्हापूर)

### प्राध्यापक झालेले

प्रा. डॉ. भैरव कुंभार, प्रा. डॉ. सी. टी. पवार, प्रा. डॉ. सी. एच. भोसले, प्रा. डॉ. एस. जे. नाईक, प्रा. डॉ. सी. बी. कोळेकर, प्रा. डॉ. पी. जी. माळी, प्रा. डॉ. तुकाराम पाटील, प्रा. डॉ. ए. डी. मुळीक, प्रा. डॉ. अलका पाटील, प्रा. डॉ. किसनराव कुराडे, प्रा. डॉ. एस. डी. शिंदे.

### सरकारी अधिकारी झालेले

- **चंद्रकांत कुंभार** (पोलिस आयुक्त, पुणे)
- **अंकुश मोरे** (सहायक आयुक्त कामगार)
- **डॉ. पांडुरंग कच्चे** (उच्चशिक्षण सहसंचालक)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ
18 NOV 2019
तरुण भारत

# विद्यापीठातील छायाचित्र प्रदर्शन पाहण्यासाठी गर्दी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने प्रथमच आयोजित केलेल्या परिसर छायाचित्रण प्रदर्शनाच्या दुसऱ्या दिवशी प्रदर्शन पाहण्यासाठी विद्यार्थ्यांसह लोकांनी गर्दी केली होती. तसेच वर्धापन दिनाचे प्रमुख पाहुणे नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांनी छायाचित्र प्रदर्शनाला भेट दिली. छायाचित्र प्रदर्शनात संकेत साळी यांनी प्रथम क्रमांक पटकावला. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित विद्यापीठ परिसर छायाचित्र प्रदर्शनात एकूण ६०० फोटो आहेत. सामध्ये विद्यापीठ परिसरातील जैवविविधता टिपलेली आहे. तसेच १२४ स्पर्धकांनी विद्यापीठातील विविध इमारती, जैवविविधता, जलसाठे, नैसर्गिक सौंदर्य, मुख्य इमारतीचा विविध अंगांनी छायाचित्र टिपलेले आहे. या प्रदर्शनाला कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, उपकुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. डी. के. गायकवाड आदींनी भेट देऊन छायाचित्रांचे कौतुक केले.

जनसंपर्क कक्ष

18 NOV [illegible]

तरूण भारत

# देशभरातील संशोधनाची माहिती एका क्लिकवर

## शिवाजी विद्यापीठात 'इंडियन रिसर्च इन्फॉर्मेशन नेटवर्क सिस्टम' विकसित : विद्यापीठातील १६९ संशोधकांचा डेटा उपलब्ध

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

समाजोपयोगी दर्जेदार संशोधनच शिवाजी विद्यापीठाला नॅकसह एनआरएफ मानांकन मिळवून देऊ शकते. दर्जेदार संशोधन करण्यासाठी विद्यापीठ नेहमीच अग्रेसर असते. विद्यापीठातील संशोधकांना देशभरातील संशोधनाची माहिती एका क्लिकवर मिळावी यासाठी विद्यापीठाने 'इंडियन रिसर्च इन्फॉर्मेशन नेटवर्क सिस्टम' नावाचे सॉफ्टवेअर विकसित केले आहे. या सॉफ्टवेअरवर सध्या १६९ संशोधकांची माहिती उपलब्ध आहे. त्यामुळे घरबसल्या संशोधकाचे संशोधन संदर्भ म्हणून संशोधकांना वापरणे सहज शक्य आहे. यासंदर्भात कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्याशी 'तरुण भारत'ने संवाद साधला आहे.

### विद्यापीठातील संशोधकांना फायदा होणार



'इंडियन रिसर्च इनफॉरमेशन नेटवर्क सिस्टम' या सॉफ्टवेअरचा विद्यापीठातील ३ लाख विद्यार्थ्यां, १४ संशोधन व अभ्यास केंद्रे आणि संशोधक प्राध्यापक विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होणार आहे. या सॉफ्टवेअरचे उद्घाटन विद्यापीठाच्या ५७ व्या वर्धापनदिनी करण्यात येणार आहे. सध्या या सॉफ्टवेअरवर विद्यापीठातील १६९ संशोधकांचा डेटा उपलब्ध आहे. संशोधकांना ज्ञानाची देवाण–घेवाण करण्यासाठी उपयुक्त ठरेल.

**कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे**

### 'इंडियन रिसर्च इन्फॉर्मेशन नेटवर्क सिस्टम'

विद्यापीठातील 'इंडियन रिसर्च इन्फॉर्मेशन नेटवर्क सिस्टम' अंतर्गत प्राध्यापक, शास्त्रज्ञ, व संशोधक विद्यार्थी यांच्या संशोधनाचे नेटवर्क तयार केले जाणार आहे. संशोधकांनी केलेल्या संशोधनाची माहिती या सॉफ्टवेअरवर मुद्रित व ऑनलाईन मिळणार आहे. भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रातील सर्व शैक्षणिक व संशोधन संस्थांमधील दुवा म्हणून हे सॉफ्टवेअर काम करणार आहे. तसेच विद्यापीठातील संशोधनाची माहिती, फोटो आणि संशोधनाचे व्हिडीओही अपलोड करता येणार आहेत.



आतापर्यंत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील संशोधनात विद्यापीठ अव्वल राहिले आहे. पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्र तर विद्यापीठाचा मानबिंदूच मानला जातो.

या प्रणालीद्वारे शिवाजी विद्यापीठातील ३२ अधिविभागांतील १६७ शिक्षकांची सुमारे २६१३ प्रकाशित शोधनिबंध, ५ इतिवृत्ते, एक पुस्तकातील प्रकरण, नऊ ग्रंथ, २८३८ तज्ज्ञ स्रोत, ६६३७८ सायटेशन्स तसेच २१० अन्य संशोधकीय माहिती उपलब्ध आहे. त्यामुळे संशोधकांना अभ्यासासाठी सुवर्ण संधी मिळणार आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. तसेच देश–विदेशातील ज्ञानाची देवाण–घेवाण करणे सहज शक्य होणार आहे. यातून एखाद्या संशोधनाला पेटंटसुध्दा मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे विद्यापीठाने संशोधकांसाठी दिलेल्या या सुविधेबद्दल सर्वत्र उत्सुकता आहे.

ग्रामीण भागातील विद्यापीठ म्हणून ओळख असलेल्या शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर गरुड भरारी घेतली आहे. संशोधनासह नॅक मूल्यांकनात राज्यातील नंबर वनचे विद्यापीठ म्हणून एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

**या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी QR Code स्कॅन करा.**

विद्यापीठाच्या यशामध्ये आतापर्यंतच्या सर्वच कुलगुरुंचे योगदान आहे. विद्यापीठाचे पहिले कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार यांनी लावलेल्या रोपट्याला यशाची गोड फळे लागली आहेत. ५७ वर्षाच्या कालावधीमध्ये विद्यापीठाने उत्तुंग यश मिळवले आहे. म्हणूनच नॅक मूल्यांकनात शिवाजी विद्यापीठ राज्यात अव्वल ठरले आहे. विद्यापीठातील सुसज्ज ग्रंथालय ही अभिमानाची गोष्ट आहे. ग्रंथालयांतर्गत संशोधन प्रकल्पातील चौर्यकर्म (प्लॅगॅरिझम) थांबवण्यासाठी सॉफ्टवेअर विकसित केले आहे. त्यामुळे कोणत्याही संशोधनाला प्लॅगॅरिझम सॉफ्टवेअरमध्ये तपासल्याशिवाय मान्यता दिली जात नाही. तसेच डेटा सायन्स रिसर्चच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ऑनलाईन जर्नल, उपलब्ध करून दिली जातात. त्याचबरोबर इन्क्लूजीव रिसोर्स सेंटर, १ हजार विद्यार्थी क्षमतेचे अद्यावत अभ्यासिका, अभ्यासिकेतील प्रवेशासाठी स्मार्ट कार्ड, युजीसी अंतर्गत शोधगंगाच्या माध्यमातून ऑनलाईन संशोधन पेपर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.



### विद्यार्थी हिताच्या महत्वाच्या गोष्टी

| | |
|---|---|
| कॉमन फॅसिलिटी सेंटर | ६ कोटी |
| क्रीडा साहित्य | दीड कोटी |
| अभ्यासिका अद्यावत | ५ लाख |
| इन्क्युबेशन सेंटर | ५ कोटी |
| प्लॅगॅरिझम | १८ लाख |
| रिसर्च सेन्सिटायझेशन ग्रँट | १० लाख |
| रिसर्च इनिसिएशन ग्रँट योजना | १० लाख |
| पाण्याचे स्त्रोत वाढवण्यासाठी | १ कोटी |

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 NOV 2010

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाचा आज वर्धापन दिन

प्रतिनिधी
कोल्हापूर

▪ नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले प्रमुख पाहुणे

शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा वर्धापन दिन सोमवार (दि. १८) सकाळी ८.३० वाजता साजरा करण्यात येणार आहे. या वर्धापन सोहळयासाठी नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. उद्धव भोसले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थिती तर शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थान भुषवणार आहेत. तसेच १७ व्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरु चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा, वॉक टू लिड बोटॅनिकल गार्डनचे उद्घाटन होणार आहे.

विद्यापीठाच्या वर्धापन दिनी विद्यापीठातील गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवक, संलग्न महाविद्यालयातील गुणवंत प्राचार्य, शिक्षक व प्रशासकीय सेवक, विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांची शैक्षणिक गुणवत्ता संपादन केलेली पाल्ये, बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक व प्राचार्य सुमतिबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा गौरव, प्रशासकीय गुणवत्ता अभियान पुरस्कारप्राप्त विभाग, उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार आदी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

सोमवारी १८ रोजी सकाळी ८.३० वाजता ध्वजवंदनाने या कार्यक्रमाला सुरुवात होईल. त्यानंतर सत्काराचा कार्यक्रम मुख्य इमारतीतील राजर्षी शाहू सभागृहात होईल. तरी या कार्यक्रमाला जास्तीत जास्त विद्यार्थी, शिक्षक, सेवक, कर्मचारी आदींनी उपस्थित रहावे असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 NOV 2019
तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५७ व्या वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसह छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. ही पाहण्यासाठी विद्यार्थ्यांसह नागरिकांनी गर्दी केली होती. (छाया : इम्रान गंवडी)